महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर**

**राज्यशास्त्र विभाग**

# सामाजिक शास्त्र विषयातील रोजगाराच्या संधी

## अहवाल

**बुधवार, दि. 16 ऑक्टोबर 2024**

आज बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'सामाजिक शास्त्र विषयातील रोजगाराच्या संधी ' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक कॉलेजमधील कला व वाणिज्य शाखेचे अधिष्ठाता प्रा. संतोष नांगरे होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. संतोष नांगरे यांनी सामाजिक शास्त्रातील इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयांचा आपल्या जीवनात कोणत्या प्रकारे उपयोग होतो व त्यातून आपले जीवन कसे घडविणे शक्य आहे याविषयी मार्गदर्शन केले. तसेच स्पर्धा परीक्षा, शिक्षण क्षेत्र, संचार माध्यमे, राजकारण, समाजकारण, शेती, व्यवसाय इ. क्षेत्रात कशा व कोणत्या संधी उपलब्ध आहेत याविषयी विस्ताराने माहिती दिली. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या अनेक शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष खडसे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात संशोधनाचे आजच्या काळातील महत्व अधोरेखित केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. संतोष खडसे यांनी सामाजिक शास्त्रामधील विषय हे मानवी जीवनातील सर्व घटकांना स्पर्श करणारे असल्यामुळे त्याचा वापर करून आपण रोजगार प्राप्त करून घेतला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला प्रा.डॉ. अंगद पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमात सुमारे ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूजा शिंदे या विद्यार्थिनीने केले तर आभार कु. प्रज्ञा कांबळे या विद्यार्थिनीने व्यक्त केले.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409




'सामाजिक शास्त्र विषयातील रोजगाराच्या संधी 'या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. संतोष नांगरे




विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रा. संतोष नांगरे



उपस्थित विद्यार्थी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. संतोष नांगरे